**आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क, महाराष्ट्र राज्य, मुंबई, यांचे कार्यालय**
दुसरा मजला, जुने जकात घर, शहिद भगतसिंग मार्ग, फोर्ट, मुंबई – ४०००२३.
Fax No. 22662370 * Tel. No. Jt. Commr. 22620238 * Dy. Commr. 22665569
E-mail – excise_commissioner@mahaonline.gov.in

वाचाले - १) शासन निर्णय सा. प्र. वि. अकंपा १०९३/२३३५/प्र. क्र. ९०/९३/आठ, दि. २६-१०-१९९४ व दि. १२-०३-१९९७.
२) शासन निर्णय सा. प्र. वि. अकंपा १००४/प्र. क्र. ५१/२००४/आठ, दि. २२-०८-२००५.
३) शासन निर्णय सा. प्र. वि. अकंपा १००९/८२६/प्र. क्र. २०१/०९/आठ, दि. ०५-०२-२०१०.
४) शासन निर्णय सा. प्र. वि. अकंपा १०१०/प्र. क्र. २४४/आठ, दि. १३-१०-२०१०.

## आदेश

क्रमांक – इएसटी १३२०१७ / ०७ / २-अ-३ मुंबई, दिनांक २४ ऑगस्ट, २०१७.

उपरोक्त वाचले येथे नमुद शासन निर्णयाच्या अनुषंगाने अनुकंपा नियुक्तीकरीता स्वतंत्र सामाईक प्रतिक्षासुचीवरील दिवंगत झालेल्या कर्मचाऱ्यांच्या खाली नमुद केलेल्या नातेवाईकांची अनुकंपा तत्वावर या विभागात ४४४०-७४४० + ग्रे. वे. १३०० या वेतनबॅण्ड मध्ये तात्पूरत्या स्वरुपात चपराशी पदावर तात्पूरती नियुक्ती करण्यात येत आहे. व त्यांची पदस्थापना त्यांच्या नांवासमोर दर्शविण्यात आलेल्या कार्यालयात करण्यात येत आहे.

| अ. क्र. | उमेदवाराचे नांव व पत्ता | पदस्थापनेचे ठिकाण |
|---|---|---|
| १ | श्री हेमंत वनु जाधव<br>मु. पो. परमोरी, ता. दिंडोरी, जि. नाशिक | आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क, महाराष्ट्र राज्य मुंबई यांचे कार्यालय. |
| २ | श्रीमती अल्का काकासाहेब फुके<br>मौजे. निमखेडा, ता. फुलंब्री, जि. औरंगाबाद | अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, औरंगाबाद, यांचे कार्यालय. |
| ३ | श्रीमती आरिफा आयुब सय्यद<br>मु. पो. खरवंडी. ता. नेवासा. जि. अहमदनगर | विभागीय उप आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क, पुणे विभाग, पुणे, यांचे कार्यालय. |
| ४ | श्रीमती कांता विजय पवार<br>रा. कासार, पिंपळगांव, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर. | अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, सोलापूर, यांचे कार्यालय. |
| ५ | श्री. अश्विन विजय राठोड<br>रा. लोकसेवा नगर, साईधाम कॉलनी, रु. नं. ३, जनहित सोसायटी, चक्कीनाका, ता. कल्याण, जि. ठाणे. | अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, नागपूर, यांचे कार्यालय. |

उपरोक्त उमेदवारांची अनुकंपा उमेदवार म्हणून राज्य उत्पादन शुल्क विभागामध्ये "चपराशी" या पदावर (४४४०-७४४० + ग्रे. वे. १३००) अधिक इतर भत्ते या वेतनश्रेणीमध्ये तात्पुरत्या स्वरुपात खालील शर्तीच्या अधिन राहून नियुक्ती करण्यात येत आहे.

१. उपरोक्त उमेदवार यांची सदरची शासकीय नियुक्ती तात्पुरत्या स्वरुपाची असुन ती पुर्वसूचनेशिवाय कोणत्याही वेळी समाप्त केली जाऊ शकेल.
२. नियुक्ती आदेशाच्या तारखेपासून तीस (३०) दिवसाच्या आत पदनियुक्तीच्या ठिकाणी हजर होणे आवश्यक आहे. उक्त मुदतीत हजर न झाल्यास त्यांची नियुक्ती रद्द करण्यात येईल. व पुन्हा त्यांना अनुकंपा तत्वावर नोकरी मिळण्याचा दावा करता येणार नाही.
३. नियुक्ती अधिकाऱ्यांच्या कार्यक्षेत्रातील कोणत्याही जिल्हा कार्यालयात ते बदलीस पात्र राहतील.
४. उपरोक्त उमेदवार यांची नियुक्ती, शासकिय सेवेसाठी वैद्यकियदृष्टया पात्र असल्याचे प्रमाणपत्र प्राप्त होण्याच्या अधिनतेने करण्यात येत आहे. वैद्यकिय चाचणीबाबतच्या सुचना देण्यात आल्यानंतर त्यांना जिल्हा शल्य चिकित्सक यांचेकडे येथे वैद्यकिय तपासणीसाठी स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल.
५. सदरची नियुक्ती ही त्यांच्या पूर्वचारित्र्य व वर्तणूक यांच्या समाधानकारक तपासणी अहवालावर

अवलंबून राहील असा अहवाल आक्षेपार्ह असल्यास त्याबाबत कोणतीही पूर्वसूचना न देता त्यांना सेवेतून काढून टाकण्यात येईल.

६. उमेदवारांनी नियुक्तीच्या ठिकाणी हजर होण्यापूर्वी नियुक्तीच्या कार्यालयात शैक्षणिक पात्रता, वय, जात, अनुभव इत्यादी प्रमाणपत्राच्या प्रती सादर कराव्यात. तसेच मुळ प्रमाणपत्रेही दाखविण्यात यावीत.

७. नियुक्तीनंतर कोणत्याही कारणास्तव उपरोक्त उमेदवार यांना शासकिय सेवेचा राजीनामा द्यावयाचा असेल तर त्यांनी नियमानुसार शासनास त्यासंबंधीची लेखी सूचना एक महिना आगाऊ देणे आवश्यक आहे. अन्यथा त्यांना एक महिन्याचे मूळ वेतन शासनाकडे जमा करावे लागेल.

८. उमेदवारास शासन सेवेत रुजू होतांना (अ) शासन निर्णय राजकीय व सेवा विभाग क्र. १५८१ / ३४, दि. ०९-०८-१९८७ मध्ये विहित केल्यानुसार वचन लिहून द्यावे लागेल. (ब) शासन निर्णय सा. प्र. विभाग, क्र. ओओडी १०६४ / ३४४३ / ३२, दि. २३-०६-१९६४ मध्ये विहित केल्यानुसार भारतीय घटनेस एकनिष्ठ राहण्याची शपथ घ्यावी लागेल.

९. उमेदवारास शासन परिपत्रक सेवा विभाग क्र. सीएलआर १०५४, दि. ३१-०१-१९५५ अथवा दि.१६-०१-१९५७ मधील तरतूदीनुसार प्रतिज्ञापत्र लिहून द्यावे लागेल.

१०. उपरोक्त उमेदवार यांना "परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना" लागू राहील.

११. उपरोक्त उमेदवार यांनी शासकिय कर्मचाऱ्यांकरिता विहित केलेल्या वर्तणूक नियमांचे काटेकोरपणे पालन करणे बंधनकारक राहील. अन्य शासकीय कर्मचाऱ्यांना लागू असणारे सर्व नियम व अटी आपणांस लागू राहतील.

( डॉ. अश्विनी जोशी )
आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रति,

१ श्री हेमंत वनु जाधव
मु. पो. परमोरी, ता. दिंडोरी, जि. नाशिक

२ श्रीमती अलका काकासाहेब फुके
मौजे. निमखेडा, ता. फुलंब्री, जि. औरंगाबाद

३ श्रीमती आरिफा आयुब सय्यद
मु. पो. खरवंडी, ता. नेवासा, जि. अहमदनगर

४ श्रीमती कांता विजय पवार
रा. कासार, पिंपळगांव, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर.

५ श्री. अश्विन विजय राठोड
रा. लोकसेवा नगर, साईधाम कॉलनी, रु. नं. ३, जनहित सोसायटी, चक्कीनाका, ता. कल्याण, जि. ठाणे.

प्रत- माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.

१. महालेखापाल (ले. व अ. / ले. प.) महाराष्ट्र-१, मुंबई.
२. अधिदान व लेखाधिकारी, महाराष्ट्र शासन, बांद्रा (पू.), मुंबई.
३. सह संचालक (लेखा व कोषागारे), राज्य उत्पादन शुल्क, म. रा. मुंबई.
४. या कार्यालयातील सर्व राजपत्रित अधिकारी.
५. सर्व विभागीय उप आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क.
६. या कार्यालयातील का. क्र. २-ब, २-क, १३, १२ (५ प्रती).